**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक १८ नोव्हेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. विधानसभा निवडणुकीच्या प्रचार तोफा आज थंडावल्या; राज्यात बुधवार दिनांक २० नोव्हेंबर रोजी एकाच टप्प्यात मतदान.
2. सत्तेत आल्यावर आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा हटविण्याचा कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांचा मुंबईतील पत्रकार परिषदेत पुनरुच्चार.
3. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था 1 ट्रिलीयन डॉलर्स इतकी बनवायची असून त्यासाठी महायुती सरकारला निवडून देण्याचं भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी.नड्डा यांचं आवाहन.
4. नागपूर इथं निवडणूक कार्यावर तैनात ४ हजार ३०० पोलीस कर्मचाऱ्यांचं बॅलेट पेपरच्या माध्यमातून मतदान; मतदान प्रक्रियेसाठी प्रशासन सज्ज.

---------------------------------------

**प्रचार शेवटचा दिवस**

राज्यातल्या २८८ विधानसभा मतदारसंघांमध्ये आणि नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठीचा प्रचार आज संपत असून, येत्या बुधवारी २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. राज्यातल्या नऊ कोटी ७० लाख २५ हजार ११९ मतदारांसाठी, एक लाख ४२७ मतदान केंद्रांवर मतदानाची व्यवस्था करण्यात आली आहे. सकाळी सात ते संध्याकाळी सहा वाजेपर्यंत मतदान करता येणार आहे. संवेदनशील मतदान केंद्रांवर केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. प्रशासनाकडून निवडणुकीची संपूर्ण तयारी झाली असून, राज्यातल्या मतदारांनी मोठ्या संख्येनं मतदान करण्याचं आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी केलं आहे. गडचिरोली जिल्ह्यातल्या संवेदनशील आणि अतिसंवेदनशील मतदान केंद्रांवर वायुसेनेच्या हेलिकॉप्टरच्या मदतीनं मतदान पथकं रवाना होत आहेत. मतदानाच्या दिवशी १३० ड्रोन आकाशातून नजर ठेवणार आहेत. निवडणूक प्रक्रियेसाठी शासनानं वायुसेनेचे ५ हेलिकॉप्टर मदतीला दिले आहेत. दोनशेहून अधिक संवेदनशील केंद्रांवर मतदान पथकातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सुरक्षितरित्या पोहोचविण्यात येत आहे. १७ नोव्हेंबरपासून सुरू झालेली ही प्रक्रिया १९ तारखेपर्यंत सुरू राहील, असं पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी सांगितलं. दोन दिवसांत अहेरी विधानसभा क्षेत्रातील ७६ आणि आज २५ अशा एकूण

१०१ निवडणूक पथकांमधील ३५० हून अधिक मतदान अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना ईव्हीएम आणि इतर साहित्यासह वायुसेनेच्या हेलिकॉप्टरद्वारे १४ बेसकॅम्पवर सुरक्षितरित्या पोहचविण्यात आले. आज गडचिरोली क्षेत्रातील १३ आणि आरमोरी क्षेत्रातील ३९ पथकातील कर्मचाऱ्यांना रवाना करण्यात आलं आहे.

------------------------------------

राहुल गांधी /विनोद तावडे

विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या आजच्या शेवटच्या दिवशी जाहीर सभा आणि रोड शो सोबतच पदयात्रा आणि मतदारांच्या गृहभेटी घेण्याकडे  उमेदवारांचा कल दिसून आला. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आज मुंबईत पत्रकार परिषद घेतली. राज्यात महाविकास आघाडीचं सरकार आल्यास आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा हटवणार असल्याचं त्यांनी सांगितलं. शेतकरी आणि महिला सक्षमीकरणावर आघाडीचा भर असल्याचं ते म्हणाले. राज्यातल्या ५ लाख युवांना रोजगार देण्याची क्षमता असलेले ७ लाख कोटी रुपयांचे प्रकल्प सत्ताधारी महायुतीमुळे महाराष्ट्रातून गुजरातला गेल्याचा आरोप गांधी यांनी केला. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत बेरोजगारी, महागाई, महिलांचे प्रश्न यासह महाराष्ट्राची संपत्ती महाराष्ट्राच्या जनतेला मिळणं हेच महत्त्वाचे मुद्दे आहेत, असं सांगून त्यांनी महाविकास आघाडीच्या जाहीरनाम्यातील आश्वासनांचा पुनरुच्चार केला. धारावी, अदानीसोबतचे भाजप नेत्यांचे संबंध यावर गांधी यांनी टीका केली. दरम्यान, उद्योगपती गौतम अदानी यांचा उदय खऱ्या अर्थानं काँग्रेसच्या नेतृत्वातील युपीए सरकारच्या काळातच झाला आहे. काँग्रेस आणि अदानींचं नातं जुनं आहे. तरीही आज काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी मोदींसोबतचा फोटो दाखवत संबंध जोडण्याचा प्रयत्न केला. मात्र, अदानींचे असेच फोटो राबर्ट वड्रा यांच्यासह काँग्रेसचे मुख्यमंत्री राहिलेले अशोक गेहलोत, भूपेंद्र हुड्डा तसेच शशी थरूर यांसारख्या अनेक काँग्रेस नेत्यांसोबतही  आहेत. हे फोटो राहुल गांधी यांना दिसले नाहीत का, असा प्रश्न भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी उपस्थित केला आहे.

------------------------------------

जे.पी.नड्डा सभा

कोणत्याही पक्षानं आपल्या कामाचं प्रगती पुस्तक ठेवलं नाही. मात्र आमचं सरकार विकासाची कामं करून पुढं गेलं आहे. त्यामुळे महाराष्ट्राला पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या सोबत पुढं जायचं आहे. जगात भारत पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनली आहे. आता महाराष्ट्राची अर्थव्यवस्था आता 1 ट्रिलीयन बनवायची आहे. त्यासाठी महायुतीचं सरकार निवडून द्या, असं आवाहन भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी.

नड्डा यांनी आज नवी मुंबईत केलं. बेलापूर विधानसभा मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवार मंदा म्हात्रे यांच्या प्रचारासाठी नेरूळ इथल्या रामलीला मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या जाहीर सभेत ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह भाजप महायुतीचे वरिष्ठ नेते उपस्थित होते.

-----------------------------------

विदर्भ प्रचार सभा

आज प्रचाराचा शेवटचा दिवस होता. आज प्रचाराच्या शेवटच्या दिवशी उत्तर नागपूर मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. नितीन राऊत यांच्या प्रचारार्थ भव्य रॅली काढण्यात आली. रॅलीमध्ये कार्यकर्त्यांसह अनेक ठिकाणी नागरिकांचा सहभाग दिसून आल्याचं आमच्या प्रतिनिधीनं कळवलं आहे. काँग्रेसनं लोकसभेत खोटं बोलून जो अपप्रचार केला, त्यामुळे जनतेचा आता त्यांच्यावर विश्वास नाही आहे. हरियाणामध्ये ज्या पद्धतीनं जनतेनं काँग्रेसला दूर केलं; तसंच महाराष्ट्रात होणार आहे. महायुतीकडे जनतेचा कल असल्यानं पूर्ण बहुमतानं आमचं सरकार येणार, असा विश्वास नागपूर जिल्ह्यातील कामठी मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार आणि भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज प्रचार रॅली दरम्यान व्यक्त केला. जाती-धर्मावरून लोकांना भटकविण्याचं काम करणाऱ्यांना धडा शिकवायचा आहे, असे प्रतिपादन आमदार बच्चू कडू यांनी केले. ते अपक्ष उमेदवार प्रिती बंड यांच्या अमरावती जिल्ह्यातील बडनेरा येथील आठवडी बाजार इथं आयोजित प्रचार सभेत बोलत होते. यावेळी कडू यांनी भाजप-काँग्रेससह स्थानिक राजकारण्यांवर सुद्धा जोरदार हल्ला चढविला. भाजप नेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव आणि तिरोडा इथं सभा घेतल्या. नागपूरच्या कामठी विधानसभा मतदारसंघात आणि गोळीबार चौकात देखील त्यांनी सभांना संबोधित केलं. दरम्यान, बंदोबस्तात असलेल्या पोलीस शिपायाचा अपघाती मृत्यू झाल्यामुळे त्यांच्या परिवाराची काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर यांनी भेट घेऊन सांत्वना दिली. अमरावती जिल्ह्यातील गुरुकुंज मोझरी इथं उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या सभेसाठी आलेल्या संदीप देविदास चौधरी या पोलीस शिपायाचा अपघाती मृत्यू झाला होता.

-----------------------------------

प्रतिबंधात्मक कारवाई

विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यापासून राज्यात सुमारे ८० हजार प्रकरणांत प्रतिबंधात्मक कारवाई झाली आहे. ५६ हजारांहून अधिक शस्त्रं जमा करण्यात आली असून ६११ शस्त्र परवाने रद्द झाले आहेत. एकूण ६५५ कोटी

रुपयांहून अधिक रकमेची मालमत्ता आचासंहिता लागू झाल्यापासून जप्त झाली आहे. त्यात १५३ कोटी रुपये रोख, २८२ कोटी रुपयांचे मौल्यवान धातू यासह इतर गोष्टींचा समावेश आहे. आचारसंहिता भंग झाल्याच्या ८ हजार ३८६ तक्रारी राज्यात प्राप्त झाल्या असून ३३ वगळता इतर तक्रारी निकाली निघाल्या आहेत. दरम्यान, राज्यात आज संध्याकाळी ६ वाजता प्रचार संपला असून, त्यानंतर प्रचारसभा, मिरवणुका आयोजित करता येणार नाही. आयोजित केल्यास आयोजक आणि सहभागी होणारे अशा दोघांवर गुन्हे दाखल होतील. यात दोन वर्षापर्यंत तुरुंगवास अथवा दंड अथवा दोन्ही अशा शिक्षेची तरतूद असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली आहे.  या कालावधीत जाहिराती करतानाही नियमांचं पालन करण्याचे निर्देश आयोगानं उमेदवारांना आणि जाहिराती प्रसारण करणाऱ्यांना दिले आहेत.

---------------------------------------

जिल्हाधिकारी पत्रकार परिषद

नागपूर जिल्हयाच्या १२ मतदारसंघांमध्ये येत्या २० नोव्हेंबर रोजी ४ हजार ६३१ केंद्रावर मतदान होणार आहे. त्यापैकी १२७ मतदान केंद्र संवेदनशील आहेत. गर्दीच्या व्यवस्थापनासाठी तसेच दिव्यांग आणि वृद्ध मतदारांसाठी सर्व योजना आणि व्यवस्था जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी आणि नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी आज दिली. 92 टक्के मतदारांना वोटिंग स्लिप्स मिळाल्या असून जास्तीत जास्त संख्येनं मतदान करण्याचं आवाहन देखील त्यांनी यावेळी केलं. दरम्यान, या विधानसभा निवडणुकीमध्ये आचारसंहितेच्या तसेच जप्तीच्या कारवाईबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी माहिती दिली.

*आतापर्यंत आपण जवळपास 40 कोटींच सिझर्स आपण केलेले आहे. कॅश, लिकर, ड्रग्स, एक्सपेन्सिव्ह आईटम, गोल्ड वगैरे आपण पकडलेला आहे. आणि 72 तासांमध्ये अजून आपण अग्रेसिव्ह होऊन त्याच्यामध्ये आपण हे सर्व्हेलिअन्स आपण वाढवणार आहो. इसबार लॉ अँड ऑर्डर का हिसाब और पक्का करने के लिए, जो हमारे इंटर डिस्ट्रिक्ट बॉर्डर है, इंटर स्टेट बॉर्डर है, वहां के जो एस एस टी वहां पर हमने सीआरपीएफ के लोग दिया सेंट्रल पुलिस फोर्स के फिर जो क्रिटिकल पुलिस स्टेशन है वहां पर माइक्रो ऑब्जर्वर जो की सेंट्रल गवर्नमेंट के एम्पलाइज है उनको भी भेजेंगे हम.*

---------------------------------------

नागपूर पोलिसांचे मतदान

राज्य विधानसभेसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. त्यावेळी निवडणूक कर्तव्यावर असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांसाठी विशेष मतदानाची सोय करण्यात आली आहे. नागपूर इथं निवडणूक कार्यावर तैनात ४ हजार ३०० पोलीस कर्मचाऱ्यांनी बॅलेट पेपरच्या माध्यमातून मतदान सुरू केलं आहे. पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र सिंगल यांनी प्रत्येक मतदान केंद्राची पाहणी करून व्यवस्थेचा आढावा घेतला.

-------------------------------------

मतदान जागृती

घटनेनं आपल्याला दिलेला मतदानाचा अधिकार हा जगातील सर्वात महत्त्वाचा हक्क आहे. माझ्या एका मतानं काय फरक पडणार, हा विचार न करता येत्या 20 नोव्हेंबर रोजी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत प्रत्येक पात्र मतदारानं न चुकता मतदान करावं. आपल्या एका मतानं नक्कीच फरक पडतो, असं आवाहन वर्ध्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी मतदारांना केलं आहे.

-------------------------------------

हवामान

विदर्भात गोंदिया जिल्ह्यात मागील २४ तासांत १४ पूर्णांक ३ दशांश अंश सेल्सियस इतक्या सर्वाधिक किमान तापमानाची नोंद करण्यात आली. त्यानंतर गडचिरोली इथं १५.२ दशांश अंश सेल्सियस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली आहे. नागपूर, चंद्रपूर, वर्धा, अमरावती, अकोला आणि बुलढाणा या सर्व जिल्ह्यांमध्ये किमान तापमान १५ ते १६ अंश सेल्सिअस दरम्यान आहे. विदर्भात सर्वाधिक कमाल तापमान वाशिम जिल्ह्यात ३४.६ दशांश अंश सेल्सियस इतकं नोंदवण्यात आलं.

-------------------------------------